**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी**

मी याद्वारे शपथपूर्वक कथन करतो की,

माझे नाव – भाऊसाहेब हरिश्चंद्र चौधरी

माझे वय ५० वर्षे व्यवसाय शेती

राहणार लहीत बु., ता.अकोले, जि.अहमदनगर.

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती के. आर. उतळे यांचेमार्फत–</u>**

**१.** दिनांक २०.०५.२०२४ रोजी दुपारी ०२.०० ते ०३.०० वाजताचे सुमारास पोलीस श्री.तळपे यांनी मला फिर्यादी ज्योती गोरक्षनाथ चौधरी यांच्या घराजवळ पंचनाम्यासाठी बोलावले होते. त्यावेळी माझेसोबत बाळासाहेब कारभारी नवले हे पंच म्हणून हजर होते. ते घटनास्थळ फिर्यादी ज्योती गोरक्षनाथ चौधरी यांनी दाखविले. पोलिसांनी त्या ठिकाणाहून वेळुच्या दोन काठ्या जप्त केल्या. घटनास्थळाच्या पूर्वेला एकनाथ दशरथ बोराडे यांचे घर, पश्चिमेला गोरक्षनाथ दादाभाऊ चौधरी यांचे घर, दक्षिणेला प्रकाश भागा चौधरी यांचे घर व उत्तरेला गोरक्षनाथ दादाभाऊ चौधरी यांची विहीर व शेतजमीन आहे. त्यानुसार पोलिसांनी माझेसमोर घटनास्थळाचा व मुद्देमाल काठ्या जप्तीचा पंचनामा तयार केला. पोलिसांनी त्या पंचनाम्यावर माझी सही घेतली. आता मला तो पंचनामा दाखविला. तो पंचनामा तोच आहे. त्या पंचनाम्यावर अ.क्र.२ वर माझी सही आहे. ती सही मी ओळखतो. त्या पंचनाम्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्या पंचनाम्याला **निशाणी पी–३१** देण्यात आली. आता मला मुद्देमाल काठ्या दाखविल्या. त्या काठ्या त्याच आहेत किंवा कसे, हे मला सांगता येणार नाही.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपींतर्फे विधीज्ञ श्री.के.बी.हांडे यांचेतर्फे उलटतपास–**

२. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी पंचनामा तयार केला व त्यावर फक्त माझी सही घेतली व त्या व्यतिरिक्त मला त्या पंचनाम्याबाबत काहीही माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी त्या गावातील असल्याने माझ्या वैयक्तिक माहितीनुसार मी घटनास्थळाच्या चतु:सिमा सांगितल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मला त्या घरांचे ग्रामपंचायत नंबर व जमिनींचे सर्व्हे नंबर सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्यादी यांच्या वाडीतील आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे फिर्यादी यांचेशी चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मला त्या ठिकाणी वाद मिटवायचा म्हणून बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी याकामी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2025.09.09 17:19:43 +0530

**(डी.एम.हिंग्लजकर)**

**दिनांक – ०९.०९.२०२५**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले,**
**ता.अकोले, जि.अहमदनगर**